**आर सी सी क्र.२५०/२०१५**
**नि. ३२ लगत**

<u>सरकारतर्फे सा.क्र. १ यांचा उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एल. एच. लांडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>

१२. दवाखान्यात मी दोन दिवस एडमिट होतो. मी दवाखान्यात १० तारखेच्या रात्री एडमिट झालो होतो आणि तेथे मी ११ किंवा १२ तारखेपर्यंत होतो. मला दवाखान्यातून नेमके कोणत्या तारखेला डिस्चार्ज केले त्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दवाखान्यातून परत घरी आल्यावर महिना दोन महिने मी घटनेची तक्रार केली नाही. दवाखान्यातून सुटल्यानंतर मी घटनेची तक्रार कोणत्या तारखेला केली हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न तुम्ही तथाकथीत घटनेची तक्रार पोलीस स्टेशनला कधी केली होती ?
उत्तर मी दि.१७.५. रोजी पोलीस स्टेशनला घटनेची तक्रार केली होती.

१३. मी दवाखान्यात असताना पोलीसांनी माझा जबाब लिहिला होता.

प्रश्न तुमच्या जमीनीलगत आरोपींची जमीन नाही ?
उत्तर आरोपींच्या मालकीची नसेल पण ते तेथे वस्ती करुन राहतात.

१४. हे म्हणणे खरे नाही की आरोपींच्या मालकीची जमीन माझ्या शेजारी नाही तसेच ते तेथे वस्ती करुनही राहत नाही त्यामूळे बांधावरुन आमच्यात वाद होण्याचे कोणतेही कारण नव्हते. हे म्हणणे खरे नाही की दि. १०.५.२०१५ पूर्वी माझे आणि आरोपींचे वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की पूर्वीच्या मतभेदांमुळे मी आरोपींना नेहमीच त्रास देत होतो. हे म्हणणे खरे नाही की मला आरोपींनी मी सांगतो तशी मी सांगितलेल्या हत्याराने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटनेच्या दिवशी माझी आणि आरोपीची प्रत्यक्ष भेटही झालेली नाही आणि मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. मी मोटारसायकल वापरतो. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटनेच्यापूर्वी मी माझ्या मोटारसायकलवरुन जोरात स्लीप होवून पडलो. हे म्हणणे खरे नाही की बालमटाकळी ते बाडगव्हाण हा रस्ता अतिशय खराब असल्यामूळे मी त्या रस्त्यावरुन मोटारसायकलने जात असताना स्लीप होवून पडलो होतो. हे म्हणणे खरे नाही की त्यामूळे मला त्या जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की त्या जखमांचा उपचार केल्यानंतर मला मिळालेल्या वैद्यकिय प्रमाणपत्राचा गैरवापर करुन मी आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर पोलीसांना हाताशी धरुन एक महिन्यानंतर खोटया तारखा टाकून आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटना घडलेली नसताना तथाकथीत घटनेचे साक्षीदार व पंच म्हणून जवळच्या नातेवाईकांची नावे टाकली आहेत. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा प्रत्यक्ष ठिकाणी केलेला नसून पंचांना हाताशी धरुन खोटया तारखा टाकून व खोटी वेळ टाकून व तारखेमध्ये खाडाखोड करुन पोलीसांना हाताशी धरुन खोटा पंचनामा तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटना दि.१०.५.२०१५ रोजी घडलेली नव्हती म्हणून मी दि.१०.५.२०१५ रोजी पोलीस स्टेशनला जाउन तक्रार नोंदवली नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर एक महिना उशीराने नियोजनपूर्वक पोलीस आणि नातेवाइकांना हाताशी धरुन मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली

आहे. मी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवर माझी सही नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की जी काही तक्रार दोषारोपपत्रासोबत आलेली आहे ती तक्रार मी दाखल केली नाही म्हणून त्यावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीविरुध्द कशी केस करायची याचे नियोजन करण्यात माझा एक महिना गेला होता. दि. १०.५.२०१५ नंतर दि. १७.५.२०१५ पर्यंत झालेला उशीर कशामूळे झाला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही तथाकथीत मारामारीची घटना घडली नाही म्हणून त्याठिकाणी पोलीसांना हत्यारे मिळाली नाही.

१५. कल्याण शेळके बालमटाकळीचे आहेत. ते माझ्या भावकीतील नाही. तथकथीत घटनेच्यावेळी कल्याण शेळके हजर नव्हते. आरोपीचे शेत माझ्या शेताच्या लगत आहे हे दाखवण्यासाठी मी आरोपीचा सात बारा उतारा दाखल करण्यास तयार नाही. हे मला सांगता येणार नाही की माझ्या शेतजमीनलगत आरोपीची शेतजमीन नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीची शेतजमीन मिळकत माझ्या शेतजमीन मिळकतीच्या शेजारी नसल्यामूळे आमचा सामाईक बांध नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींचा आणि माझा सामाईक बांध नसल्यामूळे आरोपींनी बांध फोडला असा प्रसंग घडण्याचे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की सतिश भिमराव अकोलकर आणि प्रकाश भाउसाहेब अकोलकर यांचे माझ्या गावाला येण्याचे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र ३ व ४ इतर आरोपींचे नातेवाईक आहेत. आरोपी क्र ३ व ४ इतर आरोपींचे भाचे आहेत. आरोपी क्र ३ व ४ आरोपी क्र १ व २ चे नातेवाईक आहेत हे मला पूर्वीपासून माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र ३ व ४ आरोपी क्र १ व २ चे नातेवाईक असल्यामूळे द्वेष भावनेने त्यांना त्रास देण्यासाठी त्यांचे नाव फिर्यादमध्ये नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सांगतो तशी कोणतीही घटना घडली नाही म्हणून कोणीही लोक तेथे जमले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की वैद्यकिय प्रमाणपत्रात नमूद असलेल्या जखमा मला आरोपींमूळे झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मला झालेल्या जखमांशी आरोपींचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ज्याठिकाणी राहतो त्या वस्तीला आरोपीने त्यांच्या खर्चाने कंपाउंड करुन द्यावे अशी माझी मागणी आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी मला कोणत्याही प्रकारची मारहाण केली नाही आणि शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की पूर्वीच्या वादातून आणि आरोपी कंपाउंड करुन देत नाही या कारणावरुन पोलीस आणि नातेवाइकांना हाताशी धरुन मी आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी मोटारसायकलवरुन पडल्यानंतर झालेल्या जखमांचा गैरफायदा घेउन मी खोटी फिर्याद दिली आणि आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

**sd/-**

दि. १३.०२.२०२४

(श्रीमती एस यू जागुष्टे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
शेवगाव